# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक क्र. ३३६ /२०२२

**विषय : सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था आणि प्राध्यापक यांची बँक खातेविषयक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अद्ययावत करण्याबाबत...**

**संदर्भ : परिपत्रक क्र. ३४१/२०२१ दिनांक २४/११/२०२१.**

उपरोक्त विषय व संदर्भिय परिपत्रकांअन्वये सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था आणि प्राध्यापक यांची बँक खातेविषयक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अद्ययावत करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि अद्यापपर्यंत काही महाविद्यालये/परिसंस्था व प्राध्यापकांनी बँकखातेविषय माहीती अद्ययावत न केल्यामुळे विद्यापीठास महाविद्यालये/परिसंस्था व प्राध्यापकांच्या खात्यांमध्ये रक्कम वर्ग करण्याकरिता NEFT/RTGS चा वापर करणे अडचणीचे होत आहे. विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागामार्फत विविध अनुदान, प्रवासभत्ता, दैनिक भत्ता, परीक्षासंबंधित मानधन/मेहनताना, विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना संबंधित अनुदान/रक्कम, NEFT/RTGS द्वारे संबंधितांच्या बँक खात्यात जमा केली जाते. त्याअनुषंगाने महाविद्यालये/परिसंस्था व प्राध्यापकांना निर्देशित करण्यात येते की, परिक्षा, विद्यापीठ विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना आणि गुणवत्ता सुधार योजना अशी आपली सर्व बँकविषयक माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (BOD Login) दि. ०५/१२/२०२२ पर्यंत अद्यायावत करण्यात यावी.

सबब, जी महाविद्यालये/परिसंस्था व प्राध्यापक बँक खातेविषयक माहिती अद्ययावत करणार नाहीत किंवा संबंधितांच्या बँक खात्यांमध्ये रक्कम वर्ग करण्याकरिता त्रुटी आढळल्यास याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालये/परिसंस्था व प्राध्यापक यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे-४११ ००७.
**जा.क्र.:** वित्त/२०२२-२३/१०२६
**दिनांक :** २१/११/२०२२

सीएमए चारुशीला गायके
**वित्त व लेखा अधिकारी**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. मा. संचालक, परिक्षा व मूल्यमापन मंडळ
२. मा. संचालक, विद्यार्थी विकास मंडळ
३. मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना
४. मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
५. मा. संचालक, विद्यापीठाशी संलग्नित मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

आपणांस विनंती की, सदर परिपत्रक सर्वांच्या निदर्शनास आणावे.

\\Admin7\f\d\d\anil backup\AMOL GHODE\A.F.O. Chordiya Sir\Paripatrak.docx